समाज विकास विभाग
पुणे महानगरपालिका
जावक क्रमांक :- सविवि/२६८०
दिनांक :-१९/३/२०१६

कार्यालय परिपत्रक

विषय :- संगणक ऑपरेटर व इतर सेवकांची माहिती कळविणेबाबत.

उपरोक्त विषयाबाबत मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त (जनरल) यांचे कार्यालयामध्ये दिनांक १६-०३-२०१६ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये देण्यात आलेल्या सुचनेनुसार आपल्या खात्याकडील लिपिक टंकलेखक संवर्गातील सेवकांची नवीन आकृती बंधानुसार रोस्टरची आवश्यक ती तपासणी करुन, तसेच खात्याकडे सध्या कार्यरत असलेल्या लिपिक टंकलेखक सेवकांची संख्या विचारात घेवून, किती संगणक ऑपरेटर व इतर सेवकांची आवश्यकता लागणार आहे, याबाबतची माहिती समाज विकास विभागाकडे खालील तक्त्यात तीन दिवसांच्या आत कळविण्यात यावी अशी विनंती आहे.

अ.नं.	खात्याचे नांव	नवीन आकृती बंधानुसार लिपिक टंकलेखक सेवकांची एकूण संख्या	सध्या कार्यरत असलेल्या लिपिक टंकलेखक सेवकांची संख्या	आवश्यक असणाऱ्या संगणक ऑपरेटर व इतर सेवकांची संख्या
१	२	३	४	५

मा.स.कळावे.

(गणेश सोनुने)
प्र.मुख्य समाज विकास अधिकारी
पुणे महानगरपालिका

प्रत :-सविनय अवलोकनार्थ

१) मा.महापालिका आयुक्त
२) मा.अति.महा.आयुक्त (जनरल/विशेष)

यांजकडेस् सविनय सादर-

प्रति :

१) सर्व खातेप्रमुख/विभाग प्रमुख
२) सह आयुक्त (परिमंडळ विभाग क्र. २ व ४)
३) उप आयुक्त (परिमंडळ विभाग क्र. १ व ३)
४) सर्व महा.सहा.आयुक्त (विभागीय कार्यालये)
पुणे महानगरपालिका

यांजकडे माहितीसाठी व पुढील जरुर त्या कार्यवाहीसाठी रवाना